



# विषय: भारताचा भूगोल


डॉ. एस. एन. डाळिंबे
भूगोल विभाग प्रमुख

# भारताचे स्थान

भौगोलिकदृष्ट्या विचार केल्यास भारत हा उत्तर गोलार्धात  येतो. भारताच्या तिन्ही बाजूने पाणी असल्यामुळे हा आग्नेय आशियातील एक प्रमुख द्वीपकल्प बनले आहे. भारताच्या मुख्य भूमीचे स्थान हे 8° 4' उत्तर ते 37° 6' उत्तर अक्षांश आणि 68° 7' पूर्व ते 97° 25' पूर्व रेखांशामध्ये विस्तारले आहे. अंदमान आणि निकोबार या बेटांनी पुढे दक्षिणेकडे भारताचा रेखांशीय विस्तार वाढविला आहे. ग्रेट निकोबार बेटातील  'इंदिरा पॉईंट' हे भारताचे सर्वात दक्षिणेकडील टोक आहे. तर जम्मू व काश्मीर मधील 'इंदिरा कोल' हे भारतातील उत्तरेकडील टोक आहे. भारताच्या मध्यातून  23 1/2° उत्तर अक्षांश गेले आहे. ते कर्कवृत्त या नावाने ओळखले जाते. तर  82 1/2° पूर्व रेखांश देशाच्या मध्यातून गेलेले आहे.  हे भारताचे मध्य रेखांश असून ते अलाहाबाद शहराजवळून गेलेले आहे. त्यावरूनच भारताची प्रमाणवेळ (**IST**) निश्चित करण्यात आलेली आहे.



**भारताचा विस्तार:-** रशिया, कॅनडा, चीन, अमेरिका (संयुक्त संस्थाने), ब्राझील आणि ऑस्ट्रेलिया यासाररख्या देशानंतर भारत हे जगातील सातवे मोठे राष्ट्र आहे. भारताचे एकूण क्षेत्रफळ 32, 87, 263 चौ.कि.मी इतके आहे. जगाच्या एकूण भूभागापैकी 2.42 % भाग भारताने व्यापलेला आहे. भारताची पूर्वपश्चिम रुंदी 2,933 कि.मी आणि उत्तर - दक्षिण लांबी 3,214 कि.मी, इतकी आहे.






# भारताच्या सीमा

भारताला भूसीमा व जलसीमा दोन्ही लाभल्या आहेत. देशाच्या भूसीमेची लांबी 15,200 कि.मी. आहे. उत्तरेकडे असलेला हिमालय पर्वत ही भारत आणि चीन यांच्यातील नैसर्गिक सीमा आहे. भारताच्या प्रमुख भूप्रदेशाला 6100 कि.मी. लांबीची समुद्र किनारपट्टी लाभलेली आहे. (अंदमान निकोबार आणि लक्षद्वीप बेटांचा किनारा धरून ती लांबी 7516.5 कि.मी. इतकी होते.) भारताच्या पश्चिमेला अरबी समुद्र, पूर्वेला बंगालचा उपसागर आणि दक्षिणेला हिंदी महासागर आहे.

# शेजारील राष्ट्रे

भारताच्या शेजारी एकूण 7 राष्ट्रे आहेत. भारताच्या वायव्येला पाकिस्तान आणि अफगणिस्तान, उत्तरेला नेपाळ, भूतान आणि चीन. तसेच पूर्वेकडे बांग्लादेश आणि म्यानमार (पूर्वीचा ब्रह्मदेश) हे देश आहेत. भारताच्या आग्नेयेला श्रीलंका देश असून तो पाल्कची सामुद्रधुनी आणि मन्नारचे आखात यामुळे भारताच्या प्रमुख भूभागापासून वेगळा झाला आहे.






# भारताशेजारील देशांना भारतातील राज्यांच्या लागलेल्या सीमा आणि विस्तार

| क्रमांक | सीमावर्ती देश | सीमेवर असलेले भारतीय राज्य | सर्वात लांब राज्याची सीमा | सीमा विस्तार (कि.मि.) |
|---|---|---|---|---|
| 1) | पाकिस्तान | गुजरात, राजस्थान, पंजाब, जम्मू – काश्मीर | राजस्थान | 3310 |
| 2) | अफगाणिस्तान | जम्मू काश्मीर (पाक अधिकृत) | जम्मू काश्मीर | 80 |
| 3) | चीन | जम्मू काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, सिक्कीम, अरुणाचल प्रदेश, | जम्मू काश्मीर | 3917 |
| 4) | नेपाळ | उत्तराखंड, उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, सिक्कीम | बिहार | 1752 |
| 5) | भूतान | सिक्कीम, पं. बंगाल, आसाम, अरुणाचल प्रदेश | आसाम | 587 |
| 6) | म्यानमार | अरुणाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर, मिझोराम | मिझोराम | 1458 |
| 7) | बांग्लादेश | पश्चिम बंगाल, आसाम, मेघालय, त्रिपुरा, मिझोराम | पश्चिम बंगाल | 4096 |


# राजकीय विभाग

भारत हे लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र आहे. देशाच्या राज्यकारभाराच्या सोयीच्या दृष्टीने भारतात भाषावार प्रांतरचनेनुसार जी राज्ये अस्तित्वात आलेली आहेत. त्यांची संख्या सध्या २८ आहे. आणि ९ केंद्रशासित प्रदेश आहेत. भारताची राजधानी दिल्ली असून दिल्लीला राष्ट्रीय राजधानी म्हणून विशेष दर्जा आहे. अलीकडे आंध्रप्रदेशमधील काही भाग वेगळा करून ‘तेलंगाणा’ हे नवीन राज्य निर्माण करण्यात आले आहे.

या सर्व राज्यांचा विस्ताराच्या दृष्टीने विचार केला तर सर्व राज्यांमध्ये राजस्थान हे विस्ताराने सर्वात मोठे राज्य आहे तर गोवा हे सर्वात छोटे राज्य आहे. भारत आणि इतर राष्ट्रांमध्ये ज्या सीमा आहेत. त्याही वेगवेगळ्या नावांनी ओळखल्या जातात. त्यांची नावे विद्‌यार्थ्यांना माहीत असणे आवश्यक आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यामधील सीमारेषा रॅडक्लिफरेषा म्हणून ओळखण्यात येते. भारत आणि आफगाणिस्तानमधील सीमारेषा ड्युरांड रेषा म्हणून ओळखली जाते. तर भारत व चीनमधील सीमारेषा मॅकमोहनरेषा म्हणून ओळखतात.

# राज्ये व राजधान्या

| अ. नं. | राज्य | राजधानी | अ. नं. | राज्य | राजधानी |
|---|---|---|---|---|---|
| १० | अरुणाचल प्रदेश | इटानगर | १५. | त्रिपुरा | अगरताळा |
| २. | आंध्रप्रदेश | अमरावती | १६. | नागालँड | कोहिमा |
| ३. | आसाम | दिसपूर | १७.. | पंजाब | चंदीगड |
| ४. | उत्तर प्रदेश | लखनौ | १८. | पश्चिम बंगाल | कोलकता |
| ५. | उत्तराखंड | देहराडून | १९. | बिहार | पटणा |
| ६. | ओरिसा | भुवनेश्वर | २०. | मणिपूर | इंफाळ |
| ७. | कर्नाटक | बंगलोर | २१. | मध्यप्रदेश | भोपाळ |
| ८. | केरळ | तिरूवनंतपुरम | २२. | महाराष्ट्र | मुंबई |
| ९. | गुजरात | गांधीनगर | २३. | मिझोराम | आइज़ोल |
| १०. | गोवा | पणजी | २४. | मेघालय | शिलॉग |
| ११. | छत्तीसगड | **अटल नगर** (नया रायपूर) | २५. | राजस्थान | जयपूर |
| १२. | झारखंड | रांची | २६. | सिक्कीम | गंगटोक |
| १३. | तामिळनाडू | चेन्नई | २७. | हरियाणा | चंडीगड |
| १४. | तेलंगणा | हैदराबाद | २८. | हिमाचल प्रदेश | सिमला |


भारत
राजकीय नकाशा
ताजिकिस्तान
अफगाणिस्तान
पाकिस्तान
चीन (तिबेट)
नेपाळ
भूतान
बांगलादेश
म्यानमार (बर्मा)
श्रीलंका
लडाख
लेह
श्रीनगर
जम्मू व काश्मीर
जम्मू
हिमाचल प्रदेश
शिमला
पंजाब
चंडीगड
देहरादून
उत्तराखंड
हरियाणा
दिल्ली
नवी दिल्ली
उत्तर प्रदेश
लखनौ
राजस्थान
जयपूर
सिक्किम
गंगटोक
अरुणाचल प्रदेश
इटानगर
आसाम
दिसपूर
नागालँड
कोहिमा
मेघालय
शिलाँग
मणिपूर
इम्फाल
बिहार
पटना
झारखंड
रांची
पश्चिम बंगाल
कोलकाता
अगरतला
त्रिपुरा
आयझॉल
मिझोरम
गुजरात
गांधीनगर
मध्य प्रदेश
भोपाळ
छत्तीसगड
रायपूर
ओडिशा
भुवनेश्वर
दमण
दादरा आणि नगर हवेली आणि दमण आणि दीव
मुंबई
महाराष्ट्र
तेलंगणा
हैदराबाद
यानम (पुडुचेरी)
अमरावती
बंगालचा खाडी
अरबी समुद्र
पणजी
गोवा
कर्नाटक
आंध्र प्रदेश
बेंगलुरु
चेन्नई
पुडुचेरी
माहे (पुडुचेरी)
कावरट्टी
लक्षद्वीप (भारत)
केरळ
तामिळनाडू
कराईकल (पुडुचेरी)
तिरूवनंतपुरम
पालक सामुद्रधुनी
अंदमान आणि निकोबार बेटे (भारत)
पोर्ट ब्लेअर
आंतरराष्ट्रीय सीमा
राज्य/केंद्रशासित प्रदेश सीमा
देशाची राजधानी
राज्य/केंद्रशासित प्रदेश राजधानी
हिंदी महासागर
Map not to Scale
Copyright © 2020 www.mapsofindia.com

# केंद्रशासित प्रदेश आणि राजधान्या

| अ. नं. | केंद्रशासित प्रदेश | राजधानी |
|---|---|---|
| १. | अंदमान-निकोबार | पोर्ट ब्लेअर |
| २. | चंदीगड | चंदीगड |
| ३. | दमण आणि दीव | दमण |
| ४. | दादरा व नगर हवेली | सिल्व्हासा |
| ५. | दिल्ली | नवी दिल्ली |
| ६. | पुदूचेरी | पुदूचेरी |
| ७. | लक्षद्वीप | कवारत्ती |
| ८. | जम्मू काश्मीर | श्रीनगर व जम्मू |
| ९. | लडाख | लेह |

# भारताचा भूगोल व सामान्य माहिती

| | |
|---|---|
| **भारताचे क्षेत्रफळ** | **32,87,263 चौ.कि.मी.** |
| भारताची लांबी (दक्षिण-उत्तर) | 3,214 कि.मी. |
| भारताची रुंदी (पूर्व-पश्चिम) | 2,933 कि.मी. |
| भारताचे जंगल व्याप्त क्षेत्राचे एकूण भू भागाशी प्रमाण | 23% |
| भारताच्या भू-सीमा : | 15,200 कि.मी. |
| भारताला स्पर्श करणारे एकूण देश | सात |
| **भारताची लोकसंख्या सन 2011 च्या जनगणनेनुसार** | 121,01,93,422 |
| **भारताची पुरुष संख्या सन 2011 च्या जनगणनेनुसार** | 62,37,24,248 |
| **भारताची स्त्री संख्या सन 2011 च्या जनगणनेनुसार** | 58,64,69, 174 |
| **भारताचा साक्षरता दर सन 2011 च्या जनगणनेनुसार** | 74.04% |
| **पुरुष साक्षरता दर सन 2011 च्या जनगणनेनुसार** | 82.14% |
| **महिला साक्षरता दर सन 2011 च्या जनगणनेनुसार** | 64.46% |

# भारताचा भूगोल व सामान्य माहिती

| | |
|---|---|
| **भारतास लाभलेला समुद्रकिनारा** | **7516.5 कि.मी.** |
| भारताची राजधानी | दिल्ली |
| भारताचे राष्ट्रगीत | जन-गण-मन |
| भारताचे ध्येय वाक्य | सत्य मेव जयते |
| राष्ट्रीय गीत | वंदेमातरम |
| ‘जन-गण-मन’ या राष्ट्रगीताचे कवि | रविंद्रनाथ टागोर |
| राष्ट्रीय गीत ‘वंदेमातरम’ चे कवी | बंकीमचंद्र चटर्जी |
| भारताचा राष्ट्रध्वज | तिरंगी झेंडा |

# भारताचा भूगोल व सामान्य माहिती

| **राष्ट्रीय फळ** | **आंबा** |
| --- | --- |
| राष्ट्रीय फूल | कमळ |
| भारताचा राष्ट्रीय पक्षी | मोर |
| भारताचा राष्ट्रीय प्राणी | वाघ |
| भारतात एकूण घटक राज्ये | 28 |
| भारतात एकूण केंद्रशासित प्रदेश | 9 |
| भारतात सर्वाधिक साक्षर राज्य | केरळ |
| भारतात सर्वात कमी साक्षर राज्य | बिहार |
| भारतात सर्वात जास्त क्षेत्रफळ असलेला प्रदेश | राजस्थान |
| भारतात सर्वात जास्त लोकसंख्या असलेला जिल्हा | ठाणे (महाराष्ट्र) |

# भारताची प्राकृतिक रचना

1. उत्तरेकडील पर्वतीय प्रदेश

2. उत्तर भारतीय मैदानी प्रदेश

3. भारतीय द्विपकल्पीय पठारी प्रदेश

4. भारतीय किनारी मैदानी प्रदेश

5. भारतीय बेटे.




भारतातील काही महत्वाच्या नद्या आणि त्यांची उगमस्थाने :

महाराष्ट्र देशा

गंगा---------गंगोत्री ( उत्तराखंड )
यमुना---------यमुनोत्री ( उत्तराखंड )
सिंधू----------मानसरोवर (तिबेट )
नर्मदा---------मैकल टेकडया , अमरकंटक ( मध्यप्रदेश )
तापी----------सातपुडा पर्वत , बैतुल (मध्यप्रदेश )
महानदी-------नागरी शहर( छत्तीसगड )
ब्रम्हपुत्रा-------चेमायुंगडुंग( तिबेट )
सतलज--------कैलास पर्वत( तिबेट )
व्यास---------रोहतंग खिंड ( हिमाचल प्रदेश )
गोदावरी------त्र्यंबकेश्वर , नाशिक
कृष्णा---------महाबळेश्वर fb/ganesh.82866
कावेरी---------ब्रम्हगिरी टेकड्या , कूर्ग ( कर्नाटक )
साबरमती-----उदयपूर , अरावली टेकड्या ( राजस्थान )
रावी----------चंबा ( हिमाचल प्रदेश )
पेन्नर----------नंदी टेकड्या , चिकबल्लापूर ( कर्नाटक



# भारतातील पर्वत



Kashmir
Himalayas
CHINA
Tibet
PAKISTAN
Indo-Gangetic plain
Thar Desert
Aravalli
NEPAL
8586
Kanchenjunga
BHUTAN
Ganges
BANGLADESH
Patkai
Vindhyas
Chota Nagpur
Narmada
Satpuras
MYANMAR
Godavari
INDIA
Krishna
Western Ghats
Deccan Plateau
Eastern Ghats
Arabian Sea
Bay of Bengal
www.freeworldmaps.net
SRI LANKA

**उत्तरेकडील पर्वतीय प्रदेश :** हिमालय, भारताच्या उत्तरेला हिमालय पर्वत आहे. सिंधू नदी व ब्रह्मपुत्रा नदीच्या घळ्यांदरम्यान हिमालयाच्या तीन समांतर पर्वतरांगा असून त्यांना बहिर्वक्र आकार प्राप्त झाला आहे.

**हिमालय पर्वताच्या रांगा : १) ट्रान्स हिमालय :** ब्रहद् हिमालयाच्या उत्तरेस ट्रान्स हिमालयाच्या रांगा आहेत. ट्रान्स हिमालयाचा विस्तार पश्चिम – पूर्व दिशेने असून त्याची सरासरी लांबी १००० किमी इतकी आहे. ट्रान्स हिमालयात खालील रांगांचा समावेश होतो. अ) काराकोरम रांगा, ब) लडाख रांगा, क) कैलास रांगा.

**अ) काराकोरम रांगा :** भारतातील सर्वात उत्तरेला असलेल्या या रांगांमुळे भारताची अफगाणिस्तान आणि चीनसोबत सरहद्द निर्माण होते. काराकोरमचा विस्तार पामीरपासून पूर्वेकडे गीलगिट नदीच्या पूर्वेला ८०० किमी. पर्यंत आहे. जगातील सर्वात उंचीचे २ नंबरचे आणि भारतीय सरहद्दीमधील सर्वात उंच शिखर के – २ ( गॉडविन ऑस्टीन ८६११ मीटर) याच रांगेमध्ये आहे. जगातील काही मोठ्या हिमनदीची निवासस्थाने या रांगेत आहेत. उदा. सियाचीन, बाल्टेरो, बायाफो, हिस्पर. काराकोरम रांगेत अतिशय उंच अशी शिखरे आहेत. काही शिखरांची उंची ८००० मी. पेक्षा जास्त आहे.

ब) **लडाख रांग :** सिंधू नदी आणि तिची उपनदी श्योक च्यादरम्यान लडाख रांग आहे. लडाख रांगेची लांबी ३०० किमी आणि सरासरी उंची ५८०० मी. आहे.

**क) कैलास रांग :** लडाख रांगेची शाखा पश्चिम तिबेटमध्ये कैलास रांग या नावाने परिचित आहे. सर्वात उंच शिखर कैलास आहे. **बृहद् हिमालय (Greater Himalaya) :** वैशिष्टये : १) लेसर हिमालयाच्या उत्तरेकडे भिंतीसारखे पसरलेले बृहद् हिमालयाची रांग आहे. बृहद् हिमालय हा मुख्य मध्यवर्ती प्रणोदामुळे (MCT-Main central Thrust) लेसर हिमालयापासून वेगळा झाला आहे. बृहद् हिमालयाचे महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे या रांगेत जगातील सर्वात उंच शिखरे आहेत. यातील बरीचशी शिखरे ही ८००० मी. पेक्षा जास्त आहे. या रांगेमध्ये जगातील सर्वात उंच शिखर मांऊट एव्हरेस्ट आहे. या रांगेतील अन्य शिखरे उतरत्या क्रमाने १) एव्हरेस्ट, २) कांचनगंगा, ३) मकालू, ४) धवलगिरी, ५) अन्नपूर्णा, ६) नंदा देवी, ७) कामेत, ८) नामच्या बरवा, ९) गुरला मंधता, १०) बद्रीनाथ

**लेसर हिमालय/मध्य हिमालय ((Lesser or Middle Himalaya) :** मध्य हिमालयालाच हिमाचल, हिमालया असे देखील संबोधले जाते. दक्षिणेकडील शिवालीक रांगा व उत्तरेकडील बृहद् हिमालय या दोघांना समांतर असा, लेसर हिमालय पसरलेला आहे. लेसर हिमालयाची रचना ही गुंतागुंतीची असून, या पर्वताची सरासरी उंची ३५०० ते ५००० मी. यांदरम्यान आहे. लेसर हिमालयात पुढील रांगांचा समावेश होतो.

१) पीरपंजाल, २) धौलाधर, ३) मसुरी व नागतिब्बा, ४) महाभारत

१) **पीरपंजाल :** काश्मीरमधील ही सर्वात लांब रांग असून हिचा विस्तार झेलमपासून उर्ध्व बियास नदीपर्यंत सुमारे ४०० किमीपर्यंतचा आहे. रावी नदीच्या आग्नेयकडे ही रांग पुढे धौलाधर म्हणून ओळखली जाते.

२) **धौलाधर रांग :** पीरपंजाल रांग पूर्वेकडे धौलाधर या नावाने प्रसिध्द आहे. ही रांग पुढे धर्मशाळा व सिमलामधून जाते.

३) **मसुरी, नागतिब्बा रांग :** लेसर हिमालयाच्या पूर्वेकडे जाताना फक्त काही रांगाच स्पष्टपणे ओळखल्या जातात. यापैकी मसुरी आणि नाग तिब्बा या रांगा आहेत.

४) **महाभारत रांग :** मसुरी रांग पुढे नेपाळमध्ये महाभारत रांग म्हणून ओळखली जाते. **महत्त्वाच्या खिंडी :** पीरपंजाल, बिदिल खिंड, गोलाबघर खिंड, बनीहल खिंड महत्त्वाची थंड हवेची ठिकाणे : लेसर हिमालयात सिमला (हिमाचल प्रदेश), मसुरी, राणीखेत, ननिताल, अल्मोडा ( उत्तराखंड), दार्जिलिंग ( पं.बंगाल).

## महत्त्वाच्या द-या :

१) **काश्मीर दरी :** पीरपंजाल व मुख्य हिमालयाच्या झास्कर रांगेदरम्यान ही प्रसिध्द काश्मीर दरी आहे. काश्मीर दरीची लांबी सुमारे १३५ किमी तर रूंदी सुमारे ८० किमी इतकी आहे.

२) **कांग्रा दरी :** हिमाचल प्रदेशातील ही दरी धौलाधर रांगेच्या पायथ्यापासून बियास नदीच्या दक्षिण भागापर्यंत पोहोचलेली आहे.

३) **कुलू दरी :** रावी नदीच्या उर्ध्व प्रवाहात कुलू दरी आहे.

४) **काठमांडू दरी :** नेपाळमध्ये महाभारत रांगेच्या उत्तरेस काठमांडू दरी आहे.

**शिवालीक रांगा / बाहय़ हिमालय (Outer Himalaya) :** हिमालय पर्वताच्या सर्वात बाहेरील रांग ही शिवालीक रांग आहे. या रांगेलाच बाहय़ हिमालय असे म्हणतात. हिमालयाच्या इतर रांगेच्या उत्पत्तीनंतर शिवालीक टेकडय़ांची निर्मिती झाल्याने हिमालयातील नद्यांनी वाहून आणलेला गाळ या ठिकाणी साठत गेला व येथे सपाट मदानी प्रदेशाची निर्मिती झाली. यालाच डून ((Doon) असे म्हणतात उदा. डेहराडून (उत्तराखंड), उदमपूर व कोटला (जम्मू व काश्मीर).

# भारतीय बेटे

**बेट** अथवा **द्वीप** हा पृथ्वीवरील जमीनीचा असा भाग आहे जो चारही दिशांनी पाण्याने वेढला गेला आहे. बेट हे नदी, सरोवर, समुद्र इत्यादी कोणत्याही पाण्याच्या भागामध्ये असू शकते व ते नैसर्गिक अथवा मानवनिर्मित असते. भौगोलिक रित्या समान व जवळजवळ असणाऱ्या बेटांच्या गटाला द्वीपसमूह असे म्हटले जाते.

जी बेटे जमिनीपासून जवळ आहेत त्यांना खंडीय बेटे तर जी दूर आहेत त्यांना महासागरी बेटे असे संबोधले जाते.

| | | |
|---|---|---|
| **अंदमान आणि निकोबार-**<br>बॅरन द्वीप, मोठे अंदमान,<br>छोटे अंदमान<br>रिचीचा द्वीपसमूह<br>सेंटिनेल द्वीपे<br>मोठे निकोबार<br>कार निकोबार<br>**कावेरी नदीतील द्वीपे-**<br>श्रीरंगपट्टणम<br>शिवनसमुद्रम<br>श्री रंगम | **वाशी, चोराव, दीव, दिवार- गोवा**<br>**लक्षद्वीप, माजुली, मिनिकॉय द्वीपे**<br>**मन्रो द्वीप, कोल्ळम- केरळ**<br><br>**मुंबईतील द्वीपे-** बुचर द्वीप<br>क्रॉस द्वीप, एलिफंटा द्वीप, मिडल ग्राउंड द्वीप,<br>ऑइस्टर रॉक<br>सालसेट द्वीप | **इतर द्वीप-** रामेश्वर-श्रीहरिकोटा,<br>वायपिन-कोची,<br>विलिंग्टन द्वीप-कोची,<br>कव्वयी- दक्षिण तळपट्टी<br>द्वीप २०१० मध्ये नाहीसे झाले. |

# भारतातील प्रमुख सरोवरे

| क्र. | सरोवरे | राज्य | विशेष |
|---|---|---|---|
| 1 | चिल्का | ओडिसा | भारतातील सर्वात मोठे सरोवर |
| 2 | वुलर | जम्मु व काश्मिर | भारतातील सर्वात मोठे गोड्या पाण्याचे सरोवर |
| 3 | सांबर | राजस्थान | भारतातील सर्वात मोठे खाऱ्या पाण्याचे सरोवर (भूवेष्टीत) |
| 4 | वेंबनाड | केरळ | भारतातील सर्वात लांब सरोवर |
| 5 | लोणार | महाराष्ट्र | उल्का पासून निर्माण झालेले एकमेव सरोवर |
| 6 | लोकटक | मणिपूर | पूर्व भारतातील सर्वात मोठे सरोवर |
| 7 | कोल्लेरू | आंध्रप्रदेश | गोदावरी व कृष्णा नदीच्या दरम्यान स्थित आहे. |
| 8 | भिमताल | उत्तरांचल | गोड्या पाण्याचे सरोवर |
| 9 | पुलिकत | आंध्रप्रदेश व तामीळनाडू | आंध्रप्रदेश व तामीळनाडू सिमेलगत (खाऱ्या पाण्याचे) सरोवर |
| 10 | डीडवाना | राजस्थान | खाऱ्या पाण्याचे सरोवर |

@geographystudy

# भारतातील सर्वात उंच

| **भारतातील सर्वात उंच वृक्ष** | **देवदार** |
|---|---|
| भारतातील सर्वात उंच टॉवर | टी.व्ही. टॉवर (पीतमपुरा, दिल्ली, २३५ मीटर) |
| भारतातील सर्वात उंच शिखर | **K-2 (8611** मीटर) बल्तिस्तान पाक व्याप्त कश्मीर |
| भारतातील सर्वात उंच धरण | भाक्रा नांगल धरण (**740** फु.) पंजाब- हिमाचल सीमाभागात, सतलज नदीवर |
| भारतातील सर्वात उंच दिपगृह | कोवालम, केरळ (३६ मीटर) |
| भारतातील सर्वात उंच धबधबा | गिरसप्पा/ जोग फॉल (कर्नाटक, शरावती नदी) **960** फुट |
| भारतातील सर्वात उंच मिनार | कुतुबमिनार (दिल्ली) |
| भारतातील सर्वात उंच पूल | चंबळ पुल (चंबळ नदी, १२५ मीटर, कोटा राजस्थान) |

# भारतातील सर्वात लांब

| भारतातील सर्वात लांब नदी | गंगा नदी (2,510 किमी.) |
|---|---|
| भारतातील सर्वात लांब रेल्वेमार्ग | जम्मूतावी ते कन्याकुमारी (३७१९ कि. मी.) |
| भारतातील सर्वात लांब लेणी | अजिंठा |
| भारतातील सर्वात लांब बोगदा | अटल बोगदा (हिमाचल प्रदेश, ८.९ कि. मी.) |
| भारतातील सर्वात लांब धरण | हिराकुड धरण (महानदीवर, ओरिसा, ४.८ कि. मी.) |
| भारतातील सर्वात लांब रेल्वेपुल | बोगीबील, ब्रह्मपुत्रा नदी (४.९ कि.मी) |
| भारतातील सर्वात लांब समुद्रावरील पुल | सी-लिंक, मुंबई (वरळी-बांद्रा) |
| भारतातील सर्वात लांब पूल | हावडा ब्रीज (७०५ मीटर, रविंद्र सेतु) |
| भारतातील सर्वात लांब विधुत रेल्वे मार्ग | दिल्ली ते कोलकता |
| भारतातील सर्वात लांब रस्ता पूल | गांधी सेतु, मुहम्मदपुर, पटना, बिहार ५७५० मीटर |

# भारतातील सर्वात जास्त

| भारतातील सर्वात जास्त थंड हवेचे ठिकाण | गुलमर्ग |
|---|---|
| भारतातील सर्वात जास्त साक्षरतेचे राज्य | केरळ |
| भारतातील सर्वात जास्त जंगलाव्याप्त राज्य | अरुणाचल प्रदेश |
| भारतातील सर्वात जास्त थंड ठिकाण | लेह |
| भारतातील सर्वात जास्त उष्ण ठिकाण | गंगानगर |
| भारतातील सर्वात जास्त पाऊस | मौसिनराम, चेरपुंजी (मेघालय) |
| भारतातील सर्वात जास्त खपाचे इंग्रजी वृत्तपत्र | टाईम्स ऑफ इंडिया |
| भारतातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेला जिल्हा | ठाणे (महाराष्ट्र) |
| भारतातील सर्वात जास्त शहरीकरण झालेले राज्य | महाराष्ट्र |
| भारतातील सर्वात जास्त स्त्रीयांचे प्रमाण असलेला केंद्रशासित प्रदेश | चंदिगड |
| भारतातील सर्वात जास्त लोकसंख्या घनतेचा केंद्रशासित प्रदेश | दिल्ली |
| भारतातील सर्वात जास्त काळ मुख्यमंत्रीपद भूषवणारे | ज्योती बसू (23 वर्षे) पश्चिम बंगाल |
| भारतातील सर्वात जास्त साक्षरता असलेला केंद्रशासित प्रदेश | लक्षद्वीप |

# भारतातील पवित्र स्थळे

| | | | |
|---|---|---|---|
| **आयोध्या** | **उत्तर प्रदेश, राम जन्म-भूमी म्हणून प्रसिद्ध.** | **जगन्नाथपुरी** | **जगन्नाथाची रथयात्रा प्रसिद्ध.** |
| हरिव्दार | गंगेच्या काठी कुंभमेळा भरतो. | अलाहाबाद | गंगा, यमुना, सरस्वती या तीन नद्यांचा त्रिवेणी संगम, 12 वर्षांनी येथे कुंभमेळा भरतो. |
| सारनाथ | बनारस जवळ गौतमबुद्धाचे पहिल्या प्रवचनाचे प्रसिद्ध ठिकाण. | कोल्हापूर | महालक्ष्मी मंदिर. |
| बुद्धगया | बिहारमध्ये बुद्धाला बोधी वृक्षाखाली ज्ञान प्राप्त झाले. | शिर्डी | श्री साईबाबाचे समाधीस्थान (महाराष्ट्र) |
| रामेश्वर | तामिळनाडूमध्ये शंकर पिंडीवर कावड आणून गंगोत्री जल वाहतात. | शेगांव | विदर्भात अकोल्याजवळ श्री संत गजानन महाराजांची समाधी आहे. |
| बद्रीनाथ | हिमालयात श्री विष्णूचे पवित्र मंदिर. | मथुरा | श्रीकृष्ण मंदीरे, कृष्ण जन्म स्थान. |
| बनारस | (काशी, वाराणसी) येथे गंगेच्या काठी विश्वेश्वर मंदिर आहे. | नांदेड | शिखाचे दहावे धर्मगुरू श्री गुरु गोविंदसिंहाची समाधी आहे. |
| माऊंट अबु पहाड | राजस्थान दिलवाडा पर्वतमाला जैन मंदीरे आहेत. | अमृतसर | पंजाबात शिख धर्मियांचे सुवर्ण मंदिर प्रसिद्ध आहे. |
| तिरूपती बालाजी | आंध्र प्रदेशात श्री बालाजीचे देशातील सर्वात श्रीमंत मंदिर, केशवपन मोठया प्रमाणावर केले जाते. | अमरनाथ | काश्मिरमध्ये श्रावण पोर्णिमेला बर्फाचे स्वयंभू शिवलिंग निर्माण होते. त्या दिवशी उत्सव असतो. |
| पंढरपूर | महाराष्ट्रात हिंदूचे श्रीविठ्ठल मंदिर प्रसिद्ध, आषाढ कार्तिक महिन्यात यात्रा भरते. | पार्श्वनाथ | बिहार प्रांतात जैन धर्माची ५५ देवालये आहेत. |
| केदारनाथ | हिमालयात श्री शंकराचे प्राचीन देवालय. | | |

# भारतातील काही राष्ट्रीय अभयारण्ये

| राष्ट्रीय अभयारण्य | कशासाठी प्रसिद्ध | राज्य | राष्ट्रीय अभयारण्य | कशासाठी प्रसिद्ध | राज्य |
|---|---|---|---|---|---|
| इंद्रावती अभयारण्य | वाघ | बस्तर (छत्तीसगढ) | गौतमबूद्ध अभयारण्य | वाघ | गया (बिहार) |
| सोनलरूपा अभयारण्य | | तेजपुर (आसाम) | शरावती खोरे अभयारण्य | | शिमोगा (कर्नाटक) |
| मुदुमलाई अभयारण्य | | निलगिरी (तामिळनाडू) | नागर्जुनसागर श्रीशैलम अभयारण्य | | नागार्जुनसागर श्रीशैलम (आंध्रप्रदेश) |
| देऊळगांव रेहकुरी अभयारण्य | काळवीट | अहमदनगर (महाराष्ट्र) | हजारीबाग अभयारण्य | | हजारीबाग (झारखंड) |
| पेरियार अभयारण्य | हत्ती | इद्दुकी (केरळ) | गांधीसागर अभयारण्य | चितळ | मंदसौर (मध्यप्रदेश) |
| दाचिगम अभयारण्य | हरणे (हंगुल जातीचे) | श्रीनगर (जम्मू-काश्मीर) | तुंगभद्रा अभयारण्य | | बेल्लारी (कर्नाटक) |
| घाणा अभयारण्य | पक्षी | भरतपुर (राजस्थान) | पुलीकत अभयारण्य | पाणपक्षी | पुलीकत (आंध्रप्रदेश) |
| चंद्रप्रभा अभयारण्य गिरचे अभयारण्य | सिह | वाराणसी (उत्तरप्रदेश) | सुंदरबान अभयारण्य | वाघ | चोवीस परगणा (पं.बंगाल) |
| घटप्रभा अभयारण्य | पक्षी | बेळगाव (कर्नाटक) | नल सरोवर अभयारण्य | पक्षी | अहमदाबाद (गुजरात) |
| रंगनथिट्टू अभयारण्य | पक्षी | म्हैसूर (कर्नाटक) | तानसा अभयारण्य | तानसा | (ठाणे-महाराष्ट्र) |
| कावल अभयारण्य | | अदिलाबद (आंध्रप्रदेश) | रणथंबोर अभयारण्य | वाघ | सवाई माधवपूर (राजस्थान) |
| दांडेली अभयारण्य | वाघ | धारवाई (कर्नाटक) | राधानगरी अभयारण्य | गवे | कोल्हापूर (महाराष्ट्र) |

# भारतातील काही राष्ट्रीय उदयाने

| राष्ट्रीय उदयान | स्थान | राज्य | राष्ट्रीय उदयान | स्थान | राज्य |
|---|---|---|---|---|---|
| कार्बेट राष्ट्रीय उदयान | नैनिताल | उत्तरांचल | नागारहोल राष्ट्रीय उदयान | कूर्ग | कर्नाटक |
| संजय गांधी राष्ट्रीय उदयान | मुंबई उपनगर | महाराष्ट्र | काझीरंगा राष्ट्रीय उदयान | जोरहाट | आसाम |
| प्रियदर्शनी इंदिरा गांधी (पेंच) राष्ट्रीय उदयान | नागपूर | महाराष्ट्र | खांगचेंदझोगा राष्ट्रीय उदयान | गंगटोक | सिक्कीम |
| ताडोबा राष्ट्रीय उदयान | चंद्रपूर | महाराष्ट्र | बेटला राष्ट्रीय उदयान | पलामू | झारखंड |
| नवेगाव राष्ट्रीय उदयान | नवेगाव | गोंदिया-महाराष्ट्र | गिंडी राष्ट्रीय उदयान | चेन्नई | तामिळनाडू |
| कान्हा राष्ट्रीय उदयान | मांडला | मध्यप्रदेश | दूधवा राष्ट्रीय उदयान | लखीमपुर | उत्तरप्रदेश |
| बांधवगढ राष्ट्रीय उदयान | शाहडोल | मध्यप्रदेश | वालवादार राष्ट्रीय उदयान | भावनपूर | गुजरात |
| शिवपुरी राष्ट्रीय उदयान | शिवपुरी | मध्यप्रदेश | भरतपुर राष्ट्रीय उदयान (पक्षी) | भरतपुर | राजस्थान |
| बंदीपूर राष्ट्रीय उदयान | म्हैसूर | कर्नाटक | रोहीया राष्ट्रीय उदयान | कुलू | हिमाचल प्रदेश |
| बनरघट्टा राष्ट्रीय उदयान | बंगळूर | कर्नाटक | एरावीकुलम राजमलय राष्ट्रीय उदयान | इद्दुकी | केरळ |
| हजारीबाग राष्ट्रीय उदयान | हजारीबाग | झारखंड | | | |


# भारतातील प्रमुख प्रेक्षणीय स्थळे

| प्रेक्षणीय स्थळ | शहर | राज्य |
|---|---|---|
| सुवर्ण मंदिर | अमृतसर | पंजाब |
| लाल किल्ला, जमा मस्जिद, कुतुब मीनार, विजय घाट, राष्ट्रपती भवन | दिल्ली | दिल्ली |
| ताजमहाल | आग्रा | उत्तरप्रदेश |
| मीनाक्षी मंदिर | मदुराई | तामिळनाडू |
| सूर्य मंदिर | कोणार्क | ओडिशा |
| बौध्द स्तूप | सांची | मध्यप्रदेश |
| गौतम बुध्द जन्मस्थान | लुंबिनी | नेपाळ |
| बौध्द अवशेष | विदीशा | मध्यप्रदेश |
| गोल घुमट | विजापूर | कर्नाटक |
| शालिमारबाग, निशातबाग, चष्मेशाही, डलहौसी सरोवर | श्रीनगर | काश्मीर |
| रंगमंच मंदिर | त्रिचनापल्ली | तामिळनाडु |
| बुलंद दरवाजा | फत्तेपूर शिक्री | उत्तरप्रदेश |
| हवा महल | जयपूर | राजस्थान |
| एलीफंटा गुहा, तारापूरवाला मत्स्यालय | मुंबई | महाराष्ट्र |

# भारतातील प्रमुख प्रेक्षणीय स्थळे

| प्रेक्षणीय स्थळ | शहर | राज्य |
|---|---|---|
| गेटवे ऑफ इंडिया, हैंगीग गार्डन, राणीचा बाग, मलबार हिल्स | मुंबई | महाराष्ट्र |
| शिशमहाल | इंदौर | मध्यप्रदेश |
| त्रिवेणी संगम गंगा-यमुना-सरस्वती | अलाहाबाद | उत्तरप्रदेश |
| विजयस्तंभ | चितोड | राजस्थान |
| वेरूळ व अजिंठा कोरीव लेणी | औरंगाबाद | महाराष्ट्र |
| खजुराहो | सतनाजवळ | मध्यप्रदेश |
| स्वामी विवेकानंद स्मारक | कन्याकुमारी | तामिळनाडु |
| दिलवाडा मंदिर | माउंट अबू | राजस्थान |
| रामकृष्ण मठ | बेलूर | बंगाल |
| कैलास लेणी | एलोरा | महाराष्ट्र |
| वृंदावन गार्डन, जोग धबधबा | म्हैसूर | कर्नाटक |
| बिर्ला प्लॅनिटोरीयम, हावडा ब्रीज इडन गार्डन, काली मंदिर | कोलकाता | बंगाल |
| महाकालेश्वर | उज्जैन | मध्यप्रदेश |
| गेटवे ऑफ इंडिया, हैंगीग गार्डन, राणीचा बाग, मलबार हिल्स | मुंबई | महाराष्ट्र |

**सुवर्ण चतुष्कोण:- सुवर्ण चतुष्कोण** हा भारत सरकारने हाती घेतलेला भारतातील सर्वात मोठा व जगातील ५ व्या क्रमांकाचा रस्तेबांधणी प्रकल्प आहे. भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी ह्यांनी सुवर्ण चतुष्कोण प्रकल्पाची घोषणा केली. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (भाराराप्रा) सुवर्ण चतुष्कोणासाठी जबाबदार आहे. ह्या योजनेअंतर्गत भारताची चार प्रमुख महानगरे दिल्ली, मुंबई, कोलकाता आणि चेन्नई चौपदरी वा सहापदरी द्रुतगतीमार्गांनी जोडली गेली आहेत. याची एकुण लांबी ५८४६ कि. मी. आहे.



# भारतातील राष्ट्रीय महामार्ग

| अनुक्रम | महामार्ग क्रमांक | महामार्गाचे नाव | लांबी (किमी.) |
|---|---|---|---|
| १ | १ | दिल्ली-जलंदर-अमृतसर-पाकिस्तान सरहद्द | ४५६ |
| २ | १ अ | जलंदर-जम्मू-श्रीनगर-उरी | ६६३ |
| ३ | १ ब | बातोते-दोदा-किश्तवार | १०७ |
| ४ | २ | दिल्ली-आग्रा-अलाहाबाद-कलकत्ता | १.४९० |
| ५ | ३ | आग्रा-इंदूर-धुळे-मुंबई | १,१६१ |
| ६ | ४ | मुंबई-पुणे-बंगलोर-मद्रास | १,२३५ |
| ७ | ४ अ | बेळगाव-लोंढा-पणजी | १५३ |
| ८ | ४ ब | न्हावाशेवा-कळंबोली-पळस्पे | २७ |
| ९ | ५ | बहारगोडा-कटक-विजयवाडा-मद्रास | १,५३३ |
| १० | ५ अ | हरिदासपूर-पारादीप | ७७ |
| ११ | ६ | धुळे-नागपूर-रायपूर-संबळपूर-बहारगोडा-कलकत्ता | १,६४५ |
| १२ | ७ | वाराणसी-नागपूर-बंगलोर-कन्याकुमारी | २,३६९ |
| १३ | ७ अ | पलायनकोट्टाई-तुतिकोरिन | ५१ |
| १४ | ८ | दिल्ली-जयपूर-अहमदाबाद-मुंबई | १,४२८ |
| १५ | ८ अ | अहमदाबाद-लिंबडी-कांडला | ३७८ |

# भारतातील राष्ट्रीय महामार्ग

| अनुक्रम | महामार्ग क्रमांक | महामार्गाचे नाव | लांबी (किमी.) |
|---|---|---|---|
| १६ | ८ ब | बामणबोरे-राजकोट-पोरबंदर | २०६ |
| १७ | ८ क | चिलोडा-गांधीनगर-सारखेज | ४६ |
| १८ | ९ | पुणे-सोलापूर-हैदराबाद-विजयवाडा | ७९१ |
| १९ | १० | दिल्ली-अबोहर-फाझिल्का-पाकिस्तान सरहद्द | ४०३ |
| २० | ११ | आग्रा-जयपूर-बिकानेर | ५८२ |
| २१ | १२ | जबलपूर-भोपाळ-बिआओरा-बुंदी-जयपूर | ८९० |
| २२ | १३ | सोलापूर-चित्रदुर्ग | ४९१ |
| २३ | १५ | पठाणकोट-अमृतसर-बिकानेर-समखिआली | १,५२६ |
| २४ | १७ | पनवेल-पणजी-मंगलोर-त्रिचूर | १,२६९ |
| २५ | १७ अ | कोर्टालिम-मार्मागोवा | १९ |
| २६ | २१ | चंडीगड-बिलासपूर-मनाली | ३२३ |
| २७ | २२ | अंबाला-सिमला-रामपूर-चीन सरहद्द | ४५९ |
| २८ | २३ | छास-रांची-राउरकेला-तालचेर | ४५९ |
| २९ | २४ | दिल्ली-बरेलि-लखनौ | ४३८ |
| ३० | २५ | लखनौ-कानपूर-झांशी-शिवपुरी | ३१९ |

# भारतातील राष्ट्रीय महामार्ग

| अनुक्रम | महामार्ग क्रमांक | महामार्गाचे नाव | लांबी (किमी.) |
|---|---|---|---|
| ३१ | २६ | झांशी-सागर-लाखनडन | ३९६ |
| ३२ | २७ | अलाहाबाद-मगनवान | ९३ |
| ३३ | २८ | बरौनी-गोरखपूर-लखनौ | ५७० |
| ३४ | २८ अ | पिप्रा-रक्षौल-नेपाळ सरहद्द | ६८ |
| ३५ | २९ | गोरखपूर-वाराणसी | १९६ |
| ३६ | ३० | मोहनिआ-पाटना-बख्तियारपूर | २३० |
| ३७ | ३१ | बरही-सिलिगुडी-उ,साल्माडा-अमीनगाव | १,१२५ |
| ३८ | ३१ अ | सिहोक-गंगटोक | ९२ |
| ३९ | ३१ ब | उ. साल्माडा-ब्रह्मपुत्रा नदी (किनारा) | १९ |
| ४० | ३१ क | गल्गालिआ-छल्सा-दलगाव-सिदली (बिजनीशेजारी) | २३५ |
| ४१ | ३२ | गोविंदपूर-धनबाद-जमशेटपूर | १७९ |
| ४२ | ३३ | बरही-रांची-बहारगोडाजवळ | ३५२ |
| ४३ | ३४ | डालकोला-बेऱ्हमपूर-कलकत्ता | ४४३ |
| ४४ | ३५ | बारासत-वनगाव-बांगला देश सरहद्द | ६१ |
| ४५ | ३६ | नोगाँग-दिमापूर | १७० |

# भारतातील राष्ट्रीय महामार्ग

| अनुक्रम | महामार्ग क्रमांक | महामार्गाचे नाव | लांबी (किमी.) |
|---|---|---|---|
| ४६ | ३७ | गोआलपाडा-जोरहाट-माकुम-सैखोआघाट | ६८० |
| ४७ | ३८ | माकुम-लेखापानी | ५४ |
| ४८ | ३९ | नुमालिगढ-इंफाळ-ब्रह्नदेश सरहद्द | ४३६ |
| ४९ | ४० | जोरहाट-शिलाँग-बांगला देश-सरहद्द | १६१ |
| ५० | ४१ | कोलघाट-हाल्डिया | ५१ |
| ५१ | ४२ | संबलपूर-अंगुल-कटक | २६१ |
| ५२ | ४३ | रायपूर-विजयानगरम्-चित्तीवलसा | ५५१ |
| ५३ | ४४ | शिलाँग-अगरताला | ४९५ |
| ५४ | ४५ | मद्रास-तिरुचिरापल्ली-डिंडिगल | ३८७ |
| ५५ | ४५ अ | लिंक-पाँडिचेरी | ४० |
| ५६ | ४६ | कृष्णगिरी-राणीपेट | १३२ |
| ५७ | ४७ | सेलम-त्रिचूर-कन्याकुमारी | ६४० |
| ५८ | ४८ | बंगलोर-हसन-मंगलोर | ३२८ |
| ५९ | ४९ | मदुराई-रामेश्वरम्-धनुष्कोडी | १६० |
| ६० | ५० | नासिक-पुणे | १९२ |

# भारतातील राष्ट्रीय महामार्ग

| अनुक्रम | महामार्ग क्रमांक | महामार्गाचे नाव | लांबी (किमी.) |
|---|---|---|---|
| ६१ | ५१ | पैकन-तुरा-डालू | १४९ |
| ६२ | ५२ | बैहाट चराली-तेझपूर-पासिघाट-सितापानी | ८५० |
| ६३ | ५२ अ | बंदेर देवा-इटानगर | २५ |
| ६४ | ५३ | बदरपूर-इंफाळ-सिलचर | ३२० |
| ६५ | ५४ | सिलचर-ऐजाल-तूइपांग | ४३८ |
| ६६ | ५४अ | थेरिआट-लुंगलेई | ९ |
| ६७ | ५४ ब | व्हीनस सॅडल-सैहा | २७ |
| ६८ | ५६ | लखनौ-वाराणसी | २८५ |
| ६९ | एन्ई-१ | अहमदाबाद-बडोदे | ९३ |

# आतापर्यंतचे भारताचे राष्ट्रपती व त्यांचा कार्यकाल

| राष्ट्रपती | कार्यकाल |
|---|---|
| डॉ. राजेंद्र प्रसाद | 26 जानेवारी 1950 ते 13 मे 1962 |
| डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन | 13 मे 1962 ते 13 मे 1967 |
| डॉ. झाकिर हुसेन | 13 मे 1967 ते 3 मे 1969 |
| डॉ. व्यंकट गिरी (कार्यकारी) | 20 मे 1969 ते 20 जुलै 1969 |
| न्या. महंमद हिदायतुल्ला (कार्यकारी) | 20 जुलै 1969 ते 21 ऑग. 69 |
| डॉ. वराह व्यंकट गिरी | 24 ऑग. 1969 ते 24 ऑग. 1974 |
| फक्रुद्दीन अली अहमद | 24 ऑगस्ट 1974 ते फेब्रु. 1977 |
| बी.डी. जत्ती (कार्यकारी) | 11 फेब्रु. 1977 ते 25 जुलै 1977 |
| डॉ. नीलम संजीव रेड्डी | 25 जुलै 1977 ते 25 जुलै 1982 |
| ग्यानी झैलसिंग | 25 जुलै 1982 ते 25 जुलै 1987 |
| राधास्वामी व्यंकटरमण | 25 जुलै 1987 ते 25 जुलै 1992 |
| डॉ. शंकरदयाल शर्मा | 25 जुलै 1992 ते 25 जुलै 1997 |
| के.आर. नारायणन | 25 जुलै 1997 ते 25 जुलै 2002 |
| डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम | 25 जुलै 2002 ते 25 जुलै 2007 |
| श्रीमती प्रतिभाताई पाटील | 25 जुलै 2007 ते 25 जुलै 2012 |
| प्रणव मुखर्जी | 25 जुलै 2012 ते 25 जुलै 2017 |
| रामनाथ कोविंद | 25 जुलै 2017 ते ---- |

# भारताचे पंतप्रधान व त्यांचा कार्यकाल





पं. जवाहरलाल नेहरू
(काँग्रेस)
1957 ते 1964



गुलझारीलाल नंदा
(हंगामी) (काँग्रेस)
1964 ते 1964



लाल बहादूर शास्त्री
(काँग्रेस)
1964 ते 1966



गुलझारीलाल नंदा
(हंगामी)(काँग्रेस)
1966 ते 1966



इंदिरा गांधी
(काँग्रेस)
1966 ते 1977



मोरारजी देसाई
(जनता पार्टी)
1977 ते 1979



चौधरी चरणसिंग
(जनता पार्टी )
1979 ते 1980



इंदिरा गांधी
(काँग्रेस)
1980 ते 1984



राजीव गांधी
(काँग्रेस)
1984 ते 1989



विश्वनाथ प्रताप सिंग
(जनता दल)
1989 ते 1990



चंद्रशेखर
(समाजवादी जनता पार्टी)
1990 ते 1991



पी. व्ही. नरसिंह
(काँग्रेस)
1991 ते 1996



अटलबिहारी वाजपेयी
(भाजपप्रणीत आघाडी)
(1996 बहुमत नसल्याने सरकार
13 दिवसांत कोसळले.)



एच. डी. देवेगौडा
(जनता दल धर्मनिरपेक्ष)
1996 ते 1997



इंदरकुमार गुजराल
(जनता दल)
1997 ते 1998



अटलबिहारी वाजपेयी
(भाजपप्रणीत आघाडी)
1998 ते 2004



डॉ. मनमोहन सिंग
(काँग्रेसप्रणीत आघाडी)
2004 ते 2014



नरेंद्र मोदी
(भाजपप्रणीत आघाडी)
2014 ते 2019




(---)



$ €
M
%
Ù
£
+
=
Thank you!